# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
Email ID : education.nmc@gmail.com

सिव्हील कार्यालय,नागपूर
जा.क्र. शि.वि./1813/2014
दि. 23/04/2014

## परिपत्रक

प्रति,

सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
(प्राथमिक व माध्यमिक शाळा)
म.न.पा. नागपूर

विषय :– गोपनिय अहवालाबाबत.

संदर्भ :– 1) साप्रवि/18/परि दि. 18.06.2013
2) साप्रवि/31/परि दि. 06.08.2013
3) साप्रवि/63/परि दि. 20.03.2014

मनपा शिक्षण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वार्षिक गोपनिय अहवाल लिहिणे व त्याचे जतन करणे याबाबत विहीत कार्यपद्धती अवलंबिण्यात येत नाही. असे निदर्शनास आले आहे. मनपा अधिकारी/कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदीत करणे, पुनर्विलोकन करणे व जतन करणे यासंबंधीत सुसूत्रता असावी. यादृष्टिने खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

1) दि. 28 एप्रिल 2014 पर्यंत सर्व कर्मचाऱ्यांनी आपणांस पुरविण्यात आलेले स्वयंमुल्यनिर्धारण अहवाल प्रतिवेदन अधिकाऱ्यांकडे सादर करावे.
2) दि. 15 मे 2014 पर्यंत प्रतिवेदन अधिकारी यांनी सदर गोपनिय अहवाल पुनर्विलोकनासाठी, पुनर्विलोकन अधिकाऱ्याकडे सादर करावे.
3) दि.30 मे 2014 पर्यंत पुनर्विलोकन अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या गोपनीय अहवालाचे पुनर्विलोकन करून गोपनीय अहवाल जतन करणाऱ्या अधिकाऱ्याकडे (सहा. अधिक्षक, शिक्षण विभाग) पाठविण्यात यावेत.
4) वर नमूद केलेल्या विशिष्ट कालावधीत गोपनिय अहवाल प्रतिवेदीत करणे व त्यांचे पुनर्विलोकन करणे ही कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्याची वार्षिक वेतनवाढ देण्यात येणार नाही.
5) दि. 30 एप्रिल 2014 पर्यंत जे कर्मचारी आपला स्वयंमुल्यनिर्धारण अहवाल प्रतिवेदन अधिकाऱ्याकडे सादर करणार नाही, त्यांचेबाबत त्यांना आपला स्वयंमुल्यनिर्धारण अहवाल सादर करावयाचा नाही, असे गृहीत धरून त्यांचे वार्षिक गोपनिय अहवाल प्रतिवेदीत करण्यात यावे. ही कार्यवाही दि.15 मे पर्यंत पुर्ण करावी.

6) ज्या अधिकाऱ्याकडे वार्षिक गोपनीय अहवाल प्रतिवेदित करणे व पुनर्विलोकन करणे हे काम सोपविण्यात आलेले आहे. अशा अधिकाऱ्यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे मागील वर्षाचे वार्षिक गोपनीय अहवाल प्रतिवेदीत/पुनर्विलोकन करण्यात आले आहे. अशा आशयाचे प्रमाणपत्र शिक्षणाधिकारी यांना सादर करावे. असे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच संबंधित अधिकाऱ्यास त्यांची देय वार्षिक वेतन वाढ देण्यात येईल.

नागपूर महानगरपालिका अंतर्गत शिक्षण विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वार्षिक गोपनिय अहवाल प्रतिवेदित करणे व पुनर्विलोकन करणे. यासाठी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची यादी

| अ.क्र. | ज्या अधिकाऱ्याचे/कर्मचाऱ्याचे गोपनिय अहवाल प्रतिवेदित करावयाचे आहे त्याचे पदनाम | गोपनिय अहवाल प्रतिवेदित करणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम | गोपनिय अहवाल पुनर्विलोकन करणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|
| 1 | शिक्षणाधिकारी | मा. उपायुक्त | मा. अपर आयुक्त |
| 2 | सहा. शिक्षणाधिकारी | शिक्षणाधिकारी | मा. उपायुक्त |
| 3 | शाळा निरीक्षक | शिक्षणाधिकारी | मा. उपायुक्त |
| 4 | सहा.अधिक्षक | सहा.शिक्षणाधिकारी | मा.उपायुक्त |
| 5 | माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक | सहा. शिक्षणाधिकारी | शिक्षणाधिकारी |
| 6 | माध्यमिक शाळेतील शिक्षक | मुख्याध्यापक | सहा. शिक्षणाधिकारी |
| 7 | प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक | शाळा निरीक्षक | सहा. शिक्षणाधिकारी |
| 8 | प्राथमिक शाळेतील शिक्षक | मुख्याध्यापक | शाळा निरीक्षक |

वरीलप्रमाणे सर्व संबंधितांनी नमूद वेळापत्रकानुसार कार्यवाही करून अहवाल सादर करावा.

**टिप** – सर्व मु.अ. यांनी आपल्या माताहात असलेल्या कर्मचाऱ्यांचे गोपणिय अहवाल बंद लिफाफ्यात शाळा निरीक्षक यांचेकडे सादर करावे.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रतिलीपी :–**

1) मा. अपर आयुक्त, मनपा नागपूर
2) मा. उपायुक्त, मनपा नागपूर
3) सहा. शिक्षणाधिकारी, प्राथ/माध्य. मनपा नागपूर
4) शाळा निरीक्षक झोन क्र. 1 ते 10, मनपा नागपूर
5) सहा. अधिक्षक, मनपा नागपूर

E:\VAN-FEB\VAN-09\Gosavi Sir\ Letter 2